**महाराष्ट्र शासन**

**तातडीचे/कालमर्यादा**

क्र. शेतत-२०१६/प्र.क्र. १(७४)/रोहयो-५.
नियोजन विभाग (रोहयो),
नविन प्रशासकीय भवन, १६ वा मजला, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ३२
ईमेल — desk5@mahmgnrega.com
दिनांक — ७ एप्रिल, २०१६.

प्रति,

विभागीय आयुक्त (कोकण वगळून),
जिल्हाधिकारी ( कोकण वगळून)

**विषय - "मागेल त्याला शेततळे" योजना राबविणेबाबत.**
दिनांक २९/३/२०१६ रोजी झालेल्या बैठकीबाबत.

महोदय,

२. "मागेल त्याला शेततळे" योजना राज्यात राबविण्यात येत आहे. याबाबतचा शासन निर्णय दिनांक १७ फेब्रुवारी,२०१६ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. मा.मुख्यमंत्री महोदयांनी विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांचे समवेत दिनांक २८/३/२०१६ रोजी "मागेल त्याला शेततळे" योजनेचा व्हिडीयो कॉन्फरन्स द्वारे आढावा घेतला. सदर योजने संदर्भात मा. मुख्यमंत्री महोदयांनी काही महत्वाच्या सूचना दिलेल्या आहेत.

३. त्यास अनुसरुन मा.सचिव (रोहयो) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २९/३/२०१६ रोजी बोठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, खालील नमुद केलेल्या मार्गदर्शक सुचना आपल्या स्तरावरुन कृपया निर्गमित करण्यात याव्यात ही विनंती,

१) शेततळ्याची जागा निवड अंतिम करण्यासाठी कृषि विभागाबरोबर लघू पाटबंधारे (जिल्हा परिषद), लघू सिंचन (जलसंधारण), जलसंपदा व भूजल सर्वेक्षण विकास यंत्रण या विविध यंत्रणांकडील उपलब्ध तांत्रिक मनुष्यबळ मदतीस घेण्यात यावे.

२) जिल्हाधिकारी यांनी जिल्हयासाठी/तालुक्यासाठी प्राप्त लक्षांक व त्यानुषंगाने जिल्हयामध्ये ऑनलाईनव्दारे सादर करण्यात आलेले इच्छूक शेतक-यांचे अर्ज व जिल्हयातील या विविध कार्यरत यंत्रणांकडील उपलब्ध तांत्रिक मनुष्यबळ विचारात घेवुन तालुका स्तरावर स्थानिक परिस्थितीस अनुसरुन शेततळे जागा निवड तांत्रिक- दृष्टया अंतिम करणेसाठी आवश्यकतेनुसार कृषि विभागाच्या कृषि अधिकारी / मंडल अधिकारी, अथवा त्यांचे वरिष्ठ यांचेसह लघू पाटबंधारे (जिल्हा परिषद), लघू सिंचन (जलसंधारण), जलसंपदा यांचे कडील कनिष्ठ अभियंता, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेचे अधिकारी या व इतर यंत्रणांच्या अधिका-यांना यंत्रणा निहाय गावांचे वाटप करण्यात यावे.

३) तालुका कृषि अधिकारी यांनी या योजनेंतर्गत प्राप्त झालेले सर्व अर्ज डाऊनलोड करुन घेण्यात यावेत. यंत्रणानिहाय वाटप केलेल्या गावाचे यादीनुसार तालुका कृषि कार्यालयामध्ये डाऊन लोड केलेले गावनिहाय सर्व अर्ज संबंधित यंत्रणांकडे जागा निश्चितीसाठी हस्तांतर करण्यात यावेत.

४) संबंधित यंत्रणेचे तालुका प्रमुख यांनी त्यांचे अधिनस्त क्षेत्रिय अधिकारी यांना याबाबत अवगत करुन सविस्तर सुचना दयाव्यात. प्रत्यक्ष क्षेत्रिय भेट देवुन जागा निवड अंतिम करणेबाबत आदेशित करावे.

५) क्षेत्रिय अधिकारी यांनी त्यांचा संभाव्य क्षेत्रिय गाव भेटीचा दिनांक कृषि विभागाकडे कळविण्यात यावा, जेणेकरुन संबंधित गावाचे क्षेत्रिय अधिकारी/कर्मचारी (कृषि सहाय्यक/ कृषि पर्यवेक्षक) हे भेटीचे दौरा दरम्यान संबंधित यंत्रणेचे प्रतिनिधीसोबत उपस्थित रहातील.

६) तसेच याबाबत शेतक-यालाही संभाव्य क्षेत्रिय/गाव भेटीची वेळ स्वतंत्रपणे कळविण्यात यावी, जेणेकरुन संबंधित शेतकरी उपस्थित राहून स्वत:ची शेती, गट नंबर/सर्व्हे नंबर व शेततळे घ्यावयाचे संभाव्य ठिकाण/जागा दाखवतील.

७) शेततळ्याची जागा अंतीम करण्याची कार्यवाही शासन निर्णय दिनांक १७-२-२०१६ मध्ये नमुद केलेल्या कालवधी प्रमाणे १० दिवसात कार्यवाही पूर्ण करण्यात यावी.

**शेततळयामध्ये दोन प्रकार महत्वाचे आहेत.**

अ. इनलेट आऊटलेटसहित शेततळे.
ब. इनलेट आऊटलेट विरहित शेततळे.

**(अ) इनलेट आऊटलेटसहित शेततळे :**

या शेततळयात पाणी आत भरण्यासाठी प्रवेश मार्ग व जादाचे पाणी बाहेर पडण्यासाठी निर्गमन मार्ग असतो. सदर प्रकारचे शेततळे हे भौगोलिकदृष्टया पाणलोट क्षेत्रातून वाहून येणा-या पावसाच्या पाण्यापासून नैसर्गिकरित्या भरणे अपेक्षित आहे. म्हणजेच शेततळे पूर्ण क्षमतेने भरण्यासाठी तेवढे पाणलोट क्षेत्र/अपधाव असणे अपेक्षित आहे. अशीच जागा शेततळयासाठी निवडण्यात यावी. या प्रकारच्या शेततळयामध्ये बाहेरुन कृत्रिमरित्या पाणी टाकण्याची आवश्यकता नाही. नैसर्गिकरित्या पावसाचे वाहून जाणारे पाणी शेततळयामध्ये घेण्यासाठी 2 मीटर रुंदीचा प्रवेश मार्ग ठेवायचा आहे. या प्रवेश मार्गातुन पावसाचे भूपृष्ठावरुन वाहणारे पाणी तळयामध्ये जाऊन ते पूर्ण क्षमतेने भरल्यानंतर जादाचे पाणी सुरक्षितरित्या 2 मीटर रुंदीच्या निर्गमन मार्गातुन बाहेर जाते. या शेततळयात खोदकामामध्ये निघालेल्या मातीचा काठापासून 2 मीटर अंतराचा बर्म सोडून भराव/बांध टाकावयाचा आहे. जेणेकरुन भरावाची माती ढासळुन शेततळयाच्या आतील बाजूस पडू नये. प्रवेश मार्ग व निर्गमन मार्गाचे तोंडाला दगडी अस्तरीकरण करावे जेणेकरुन तळाची झीज होणार नाही.

**(ब) इनलेट आऊटलेट विरहित शेततळे :**

या शेततळयामध्ये प्रवेश मार्ग आणि निर्गमन मार्ग नसतो व बाजूचा भराव अखंड असतो. हे शेततळे बाहेरुन पाणी आणून कृत्रिमरित्या भरावयाचे आहे. यासाठी आपल्याकडे पाण्याचा नैसर्गिक अथवा कृत्रीम स्त्रोत असणे आवश्यक आहे. पाण्याच्या स्त्रोतामधून पाणी उचलून शेततळयात भरणेसाठी साधन-सामुग्री (उदा.इलेक्ट्रीक मोटर,इंजिन,पाईप लाईन इ.) असणे आवश्यक आहे. या शेततळयात खोदकाम ते भराव यामध्ये बर्म सोडू नये. अशा शेततळयाला भविष्यात प्लॅस्टीक आच्छादन बसवुन चांगल्या प्रकारे पाणी साठवणूक करता येते. यामध्ये प्लॅस्टिक चा खर्च लाभार्थीने स्वत: करावा.

सदर शेततळयामध्ये टाकण्यात येणारा भराव हा तळयाच्या चारही बाजूने अखंडपणे टाकण्यात येतो. त्यामुळे शेततळयाच्या आकारमानानुसार जमिनीच्या वर सुमारे 2.10 मी. ते 2.50 मी. उंचीचा भराव तयार होतो. अशाप्रकारे शेततळयाची खोली (भरावाच्या वरील टोकापासून) 5.10 मी. ते 5.50 मी. मीटर खोल असणार आहे. या तळयामध्ये सुमारे 4.60 ते 5.00 मीटर उंचीचा पाणीसाठा करता येतो.

८) तांत्रिक प्रतिनिधीने शेतक-याच्या शेतात प्रत्यक्ष भेट देवुन शेताची सर्वसाधारण पहाणी करावी. याबाबत वरील मार्गदर्शक सुचनेनुसार शेतक-याची शेततळे प्रकाराची व आकाराची मागणी योग्य आहे काय याची पडताळणी करण्यात यावी. मागणी केलेल्या शेततळयाचा प्रकार, आकार व जागा याबाबत सर्व दृष्टिकोनातुन विचार करण्यात येवुन जागा निवड अंतिम करण्यात यावी.

तसेच इनलेट आऊटलेटसहित शेततळयात पाणी आत भरण्यासाठी प्रवेश मार्ग व जादाचे पाणी बाहेर पडण्यासाठी निर्गमन मार्ग असतो. सदर प्रकारचे शेततळे हे भौगोलिकदृष्टया पाणलोट क्षेत्रातून वाहून येणा-या पावसाच्या पाण्यापासून नैसर्गिकरित्या भरणे अपेक्षित आहे. म्हणजेच शेततळे पूर्ण क्षमतेने भरण्यासाठी तेवढे पाणलोट क्षेत्र/अपधाव असणे अपेक्षित असल्याने या संदर्भातील आवश्यक त्या मार्गदर्शक सूचना आयुक्त, कृषि यांनी निर्गमित कराव्यात.

९) जागा निवड अंतिम झाल्यानंतर वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेमार्फत (एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम) क्षेत्रिय स्तरावर मृद व जलसंधारणाचे पूर्ण झालेल्या उपचाराचे फोटो आज्ञावलीमध्ये अपलोड करण्यासाठी [Vmon१ (Software)] संगणक आज्ञावली विकसीत केलेली असुन या संगणक आज्ञावलीच्या मदतीने आपल्याला निवड केलेल्या जागेचा शेततळे खोदकामापूर्वी क्षेत्रिय फोटो (अंक्षाश,रेखांशासह) या आज्ञावलीमध्ये अपलोड करता येतो. या आज्ञावलीचा वापर "मागेल त्याला शेततळे" या योजनेच्या जागा निवडीमध्ये करण्याचा आहे. यामध्ये शेततळे करण्यासाठी इच्छूक असलेला शेतकरी संबंधित यंत्रणेचे प्रतिनिधी व कृषि विभागाचे प्रतिनिधी यांचा निवडलेल्या जागेवर शेततळे घेण्यापूर्वी फोटो घेण्यात यावा.

१०) फोटो घेताना अशा पध्दतीने घेण्यात यावा की, ज्यामध्ये स्थळदर्शक (विहिर, शेती,लाईटचा खांब, शेतातील गोठा इ.) अथवा इतर स्थायी चिन्ह येईल.

११) भविष्यात शेततळयाचे पूर्ण खोदकाम झाल्यानंतर याच जागेवरुन पुन्हा याच कोनातुन जुनी स्थळदर्शक चिन्हे समाविष्ट होतील अशा पध्दतीने संबंधित लाभार्थीसह शेततळयाचा फोटो घेवून तुलना होणार असल्याने सुरुवातीस फोटो घेणेबाबत योग्य ती दक्षता घेण्यात यावी.

१२) शेततळे योजना अंतर्गत इच्छूक शेतक-याने शासन निर्णयात नमूद कार्यपध्दतीनुसार शेततळे खोदून पूर्ण केल्यानंतर कार्यालयास लेखी कळविण्याचे आहे. तदनंतर संबंधित कृषि विभागाचे क्षेत्रिय कर्मचारी यांनी मोजमापे घेवुन मापन पुस्तकात नोंदविण्याची आहेत व पूर्ण झालेल्या शेततळयाचा लाभार्थी उपस्थितीसह नैऋत्य कोप-यावरुन आज्ञावलीमध्ये फोटो अपलोड करणेचा आहे. यासाठी उपरोक्त नमूद वसुंधरा कार्यालयाकडील Vmon१ या संगणक आज्ञावलीचा वापर करणेचा आहे.

१३) तपासणीनंतर शेततळयाचा प्रकार व आकार तसेच प्रत्यक्ष खोदकाम या नुसार मंजूर अनुदान थेट लाभार्थीचे बँक खात्यावर शासन निर्णयात नमूद केल्यानुसार जमा करणेचे आहे.

१४) मंजूर अनुदान लाभार्थीचे थेट बँक खात्यावर जमा करणेसाठी राष्ट्रीय फलोत्पादन अभियान योजनेंतर्गत अनुदान अदायगीसाठी कार्यान्वित आज्ञावलीचे धर्तीवर MRSAC NIC च्या मदतीने नवीन आज्ञावली विकसीत करण्यात यावी. सदर आज्ञावलीचा वापर या योजनेंतर्गत अनुदान अदायगीसाठी करणेत यावा.

उपरोक्त मार्गदर्शक सूचना तसेच या प्रकरणी इतर आवश्यक सूचना तात्काळ निर्गमित करण्यात याव्यात.

आपला,

( प्रमोद शिंदे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन